Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – २२/०६/२०२४

### दि. २१/०६/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ३२४/२०२४ भा.दं.वि कलम ३०२,२०१

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/०६/२०२४ रोजी १९:३० वा.ते २१:०० वा.चे दरम्यान गाथा मंदीर मागील,घाट परिसर येथील आनंद डोहमध्ये असलेल्या श्रीकृष्ण मंदीरा मागे घाटावर,देहुगाव,पुणे

गुन्हा दाखल :- दि.२१/०६/२०२४ रोजी ०६.२७ वा.

फिर्यादी :- किरण राजाभाऊ पाटील पोलीस शिपाई २५८९,देहुरोड पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड,

आरोपी :- जयदीप अर्जुन यादव वय.२९ वर्षे,रा.वैभव कांबळे यांच्या घरी भाडयाने, ओम साई सोसायटी,जैन मंदीरासमोर,देहुगाव,
पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी गाथा मंदीर मागील,घाट परिसर येथील आनंद डोहमध्ये असलेल्या श्रीकृष्ण मंदीरा मागे घाटावर,देहुगाव,पुणे या ठिकाणी नमुद आरोपी यांने त्यांची पत्नी नामे प्रतिक्षा जयदीप यादव वय.२१ वर्षे हिचे विवाह बाहय संबध असल्याचा संशय घेवुन तसेच ती शारीरीक संबध ठेवु देत नाही याबाबीचा राग मनात ठेवुन तिला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने ओढणीच्या सहाय्याने गळा आवळुन जिवे ठार मारले व गुन्हा लपविण्याचा बनाव करुन यांतील मयत प्रतिक्षा जयदीप यादव व त्यांचा स्वतःचा वापरता मोबाईल हॅन्टसेट घटनास्थळा जवळील इंद्रायणी नदीमधील पाण्यामध्ये फेकुन पुरावा नष्ट केला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि खणसे ९८२३६६५३४४

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ३१३/२०२४ भा.दं.वि. कलम ३०७,३४१, ३२३,५०४, ५०६,१४३, १४७,१४८, १४९,सह, भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५, क्रिमीनल ॲमेन्डमेन्ट ॲक्ट कलम ३ ७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/०६/२०२४ रोजी रात्रौ १०/१० वा चे सुमारास मातोश्री बिल्डींग समोर, पी एम आर डी रोड, सेक्टर १२ एमआयडीसी भोसरी पुणे येथील सार्वजनिक रोडवर

गुन्हा दाखल :- दि २१/०६/२०२४ रोजी १३.२१ वा.

फिर्यादी :- रेश्मा फहिम शेख वय-४० वर्षे रा. चंद्रभागा लॉन्सच्या शेजारी, जाधववाडी, चिखली प्राधिकरण, पुणे

आरोपी :- १)अर्थव उदय पकाले, वय २० वर्षे, रा. पी.एम.आ.डी.ए. वसाहत सेक्टर१२,
२) सुरज रणदिवे, रा घरकुल, चिखली,
३) विवेक विनोद नाईक ऊफ सोन्या
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा फैज फहिम शेख यास आरोपी १ याने फिर्यादी यांचे मुलास तु मला सारखे पैसे मागुन त्रास देतो काय असे म्हणुन थांब आता तुला जीवंत सोंडत नाही तुला ठार मारतो असे म्हणुन त्याचे हातातील लोंखंडी रॉडने डोकीस ठिकठिकाणी जोराचा घाव घावुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे त्यावेळी त्याचा मित्र आरोपी २ याने ही मुलगा फैज याच्या डोक्यास रॉडने मारुन गंभीर जखमी केले आहे तसेच आरोपी ३ याने सदर ठिकाणी लोक भांडणे सोडविण्यास येवु नयेत म्हणुन हातातील कोयता हवेत फिरवुन त्यांचे इतर सहा साथीदार यांनी जुने वादाच्या कारणावरुन लाथाबुक्यानी मारहाण करुन फिर्यादी यांचा मुलगा फैज फहिम शेख वय-१९ वर्ष यास गंभीररित्या जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे तसेच त्याचा मित्र विशाल गौतम वय-१९ वर्ष याला शिवीगाळ व मारहाण करुन जखमी केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पठारे ८८८८८१०९५७

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३२०/२०२४ भा.दं.वि कलम ३०८,१४३, १४४,१४७, १४८,१४९ आर्म ॲक्ट कलम ३(२५), क्रि.लॉ.अ.कलम३,७ म.पो.का.क ३७(१),१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०६/२०२४ रोजी २०/१० ते २०/३० वा.चे सुमारास गजानन चौक,शाळा चौक, राजेंद्र चौक मारुती मंदिर चौक,तळेगाव दाभाडे, ता. मावळ जि. पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी ०२.४९ वा |
| फिर्यादी | :- | आनंद तुकाराम मोहिते, पोकॉ २०५९, नेमणुक तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय पुणे |
| आरोपी | :- | १) रोहण ऊर्फ चिक्या उत्तम शिंदे,रा.शिवाजी चौक,तळेगाव स्टेशन, तळेगाव दाभाडे ता. मावळ जि पुणे<br>२) विकी खराडे व इतर चार अनोळखी इसम<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पोलीस स्टेशन हदिदत पेट्रोलींग करत असतांना तळेगाव पोलीस स्टेशन रेकॉर्ड वरील फिर्यादीचे ओळखीचे नमुद आरांपी यांनी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन हदीत रोडवर सार्वजनिक ठिकाणी लोकांचे रहदारीचे ठिकाणी कोणाचेही जिवितास धोका निर्माण होईल याची जाणीव असतांना सुध्दा जवळ असलेल्या पिस्टलसारख्या घातक अग्नीशस्त्रामधुन फायर करुन सदर भागामध्ये भयाचे वातावरण निर्माण करुन व दहशत निर्माण करुन निघुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कोकाटे ९१५८५७३००१ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ७७५/२०२४ भादवि कलम-२७९,३३७, ३३८ मो.वा.का कलम-१८४, १३४(अ)(ब) प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी सकाळी ११/४५ वा चे बेंगलोर ते मुंबई जोणारे हायवेवर ऑडी शोरुम सुसखींड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी २२/३४ वा. |
| फिर्यादी | :- | गोपाल विष्णु चौगुले व.व.२३ धंदा-मजुरी सध्या रा.वाघोली ता.हवेली जिल्हा-पुणे |
| आरोपी | :- | एक पांढ-या रंगाची स्वीफ्ट डिझायार कार वरील अज्ञात चालक कारचा नंबर माहीत नाही. |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मोटार सा. नं.एमएच-१२-क्युपी-०३४३ हीला आमचे पाठीमागुन येणारे एक पांढ-या रंगाची स्वीफ्ट डिझायर कारचे चालकाने भरधाव वेगात,निष्काळजीने त्याची कार चालवुन आमचे एक्टीवा मोटार सायकलला जोराचा कट मारुन धडक देऊन तो कार चालक तेथुन पळुन गेला आम्ही आमचे मोटार सायकलसह जोरात खाली पडलो त्यामधे उमाकांत रासने यांचे डोक्याला जोराचा मार लागला आहे तसेच फिर्यादीचे उजव्या हाताला व उजव्या पायाला मुक्का मार लागला आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि झोल ८२७५३८७४७७ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ७७४/२०२४ भा.द.वि.कलम ४०६,४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क), ६६(ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/०४/२०२४ रोजीचे सायंकाळी १०/५५ वा.ते दिनांक १३/०६/२०२४ रोजी पर्यंत मुळशी,जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी १९/५९ वा. |
| फिर्यादी | :- | फिर्यादी ४५ वर्षे धंदा नोकरी रा माण फेज ३ ता, मुळशी, जि. पुणे |
| आरोपी | :- | मोबा नं.७८९१०२८१६७ धारक रवी सिंग नावचा अनोळखी व्यक्ती |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या घरी फिर्यादी त्यांचे राहते घरी असतांना वेळोवेळी फिर्यादी यांचे SBI बचत खाते व icici bank बचत खाते .तसेच फिर्यादी यांचे वडील वय ८० वर्षे यांचे SBI बचत खाते व icici bank बचत खाते यावरुन वरील वेगवेगळ्या अकाऊंट धारकांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन ज्यादा परताव्याचे अमिष दाखवुन वेळोवळी फिर्यादीसोबत खोटे बोलुन वेगवेगळ्या शेअर्श मध्ये गुंतवणुक करण्यास प्रवृत्त करुन त्यांचे वरील खात्यात ऑनलाईन रक्कम, भरावयास प्रवृत्त करुन फिर्यादी यांचेकडुन एकुण २४,४३,७३३/-रुपये ( चोवीस लाख त्रेचाळीस हजार सातशे तेत्तीस रुपये) हे पाठविण्यास सांगुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि घाडगे ८४२५८९८२४७ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी २८०/२०२४ भा.द.वी कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१९/०६/२०२४ रोजी रात्री १०/०० ते दिनांक २०/०६/२०२४ रोजी सकाळी ०७/३० वा. चे दरम्यान गणेश गगर बोफखेल पुणे याचे पहिला मजला |
| गुन्हा दाखल | :- | दि. २१/०६/२०२४ रोजी१८/४९ वा. |
| फिर्यादी | :- | शंकर प्रसाद शुक्ला वय ६८ वर्षे व्यवसाय - आर्मी सेवानिवृत्त रा. सर्व्हे नंबर १४८/१/१/६१ कॉलनी नंबर १० गणेश गगर बोफखेल पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेही व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह त्यांचे मुलाकडे सिंगापुर येथे त्यांचे दिघी पुणे येथिल घरास लॉक लावुन गेले होते त्यानंतर वर नमुद ता.वेळी व ठिकाणी अज्ञात चोरटयांनी त्यांचे घराचे कशाचे तरी सहायाने लॉक व लॅच तोडुन घरामध्ये प्रवेश करुन घरातील २,७६,५००/- रु की चे सोन्याचे व चांदीचे व इतर दागीने व वस्तुंची चोरी केली आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिंगारे ८६६९५४७३४२ |

०७

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ७४२/२०२४, भा.दं.वि. कलम ३६५,३२८, ३२३,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१९/०६/२०२४ रोजी ०३/३० वा.चे दरम्यान अशिष जानवर यांचे रिअल इस्टेटचे ऑफिस वाकड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी २१.०७ वा |
| फिर्यादी | :- | निकिता बबन बो-हाडे वय-२७ वर्षे, धंदा-नोकरी, रा.माऊली चौक, वाकड पुणे |
| आरोपी | :- | १) सुमित दिलीप शहाने वय-३२ वर्षे अंदाजे<br>२) पिंगळा दिलीप शहाने वय ६० अंदाजे<br>३) विक्रांत पुर्ण नाव पत्ता नाही वय ३० वर्षे अंदाजे सर्व मुळेवाडी रोड, लक्ष्मीरत्न सोसायटी, रो हाऊस नं.१, मंचर ता.आंबेगाव, जि.पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या त्यांचे ऑफिसमध्ये काम करत असताना तेथे फिर्यादी यांचे पती आरोपी क्र.१ व आरोपी २ ते ३ असे तेथे आले. त्यांनी तेथे फिर्यादी यांच्या सोबत भांडण करुन फिर्यादी व आरोपी नं.१ यांच्यात असलेल्या घटस्फोटाचे पेपरवर सही करायची आहे तु मंचरला सोबत चल असे बोलल्याने फिर्यादी यांनी त्यांचे सोबत जाण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपी १ व २ यांनी फिर्यादी यांना जबदरस्तीने बाहेर असलेल्या इनोव्हा गाडीमध्ये घेवुन त्यांना सुरवातीला महाळुंगे पडवळ ता.आंबेगाव, जि.पुणे त्यानंतर चांडोली ता.आंबेगाव तसेच मंचर ता.आंबेगाव जि.पुणे येथे घेवुन गेले त्यांनी फिर्यादी यांना भुलीचे इंजेक्शन देवुन त्यांना मारहाण करुन, त्यांचा रेडमी कंपनीचा मोबाईल काढुन घेतला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि सुर्यवंशी ९४०३४९६२७८ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ३२५/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४(२५)व महाराष्ट् पोलीस अधिनियम ९१५१चे कलम ३७(१) (३) सह १३५ ,१४२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी १६/४० वा चे दरम्यान गाथा मंदीररोड वडाचा माळ देहुरोड ठीकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०६/२०२४ रोजी २२/५० वा |
| फिर्यादी | :- | उध्दव बद्रीनाथ खेडेकर पोलीस शिपाई २०५९ नेमनुक देहुरोड गुन्हे शाखा युनिट -२पिंपरी चिंचवड पुणे |
| आरोपी | :- | प्रशांत दिलीप कोकरे वय.३१ वर्षे रा.हनुमान मंदीरामागे दळवीनगर झोपडपट्टी चिंचवड पुणे<br>आरोपी अटक आहे |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरीचिंचवड यांचे कार्यालयीन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे, सोटे, तलवारी, कोयते, भाले, बंदुका, दगड जेणे करुन शरीरास इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बाळगण्यास मनाई आदेश असताना सदर आदेशाचा भंग करुन २००/- रु कीचा एक लोखंडी सत्तुर आपले कब्जात बाळगला असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोहवा/९०३ कालेकर ९८५०३३१३०३ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ३१२/२०२४ भा.दं.वि कलम २७९,४२७, ३३७,मोटार वाहन कायदा कलम १८४,११९/ १७७, ३(१),१८१,५/१८० ,एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २७, २९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/०६/२०२४ रोजी ११/३० वा.सुमारास शाहुनगर चिंचवड येथील महाबली चौका शेजारी अंबिका सोसायटी समोरील रस्त्याच्या कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/०६/२०२४ रोजी ०२.४५ वा |
| फिर्यादी | :- | प्रमोद लक्ष्मण फाळके, पोलीस शिपाई २३१६, वय ४७ वर्षे, नेमणुक- एम.आय.डि.सी.भोसरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, |
| आरोपी | :- | विधी संघर्षित बालक वय-१४ वर्षे,(जन्म तारीख १७/०३/२०१०) रा. चिखली, मुळ रा.महुआ पकर,ता.गुरनचौकी,जि.गोंडा,उत्तरप्रदेश |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी शाहुनगर चिंचवड येथील महाबली चौका शेजारी अंबिका सोसायटी समोरील रस्त्याच्या कडेला फुटपाथ जवळ उभी असलेली कार नं. एम.एच.१४ जी.एन.२४५८ हिस रंगाची मॅस्ट्रो दुचाकी गाडी नंबर एम.एच.१४ जी.बी.५७८० हि वरील चालक नमुद विधी संघर्षित बालक याने पाठीमागुन भरधाव वेगात गाडी चालवुन,रोडवर उभ्या असलेल्या कार नं. एम.एच.१४ जी.एन.२४५८ हिला धडक देवुन उपघात करुन अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान करुन,स्वतःचे दुखापतीस कारणीभुत झाला व त्याचे मॅस्ट्रो दुचाकी गाडी नंबर एम.एच.१४ जी.बी.५७८० मधील डिकीत १४ ग्रॅम वजनाचा गांजा २००/- रु.किं.चा अनाधिकाराने, बेकायदेशिर रित्या बाळगुन मिळुन आले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि गोडबोले ८७८८२५२५६५ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३२१/२०२४ भादवि कलम ३८०,४६१ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१९/०६/२०२४ रोजी २०/०० वा. ते दि. २०/०६/२०२४ रोजी सकाळी १०/०० वा. चे दरम्यान मौजे तळेगाव दाभाडे गावचे हद्दीत, जिजामाता चैक येथील ओरिएंटल बॅकशेजारी तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २१/०६/२०२४ रोजी १८/३९ वा. |
| फिर्यादी | :- | साक्षी संदिप भोजणे, वय ३६ वर्षे, व्यवसाय वायर हारनेस, रा. वर्धमान रिसिस्टंट फ्लॅट नं. १०५ म्हसकरनेस कॉलनी नं. २ तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे मो. नं. ९९७५३५७१७२ |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे ओरिएंटल बॅकशेजारी असलेले बंद शॉप उचकटुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने शॉपमध्ये आत प्रवेश करून, शॉपमधील लहान मोठया कट वायरी, छोटे ब्रस टर्मिनल, प्लास्टिकचे कपलर असा एकुण १,६८०००/- रू किंमतीचा माल मुददाम लबाडीचे इरादयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय चोरी करून चोरून नेल्या आहेत |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि इंगळे |